नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ८२ | Issue - 82 | वार शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५३ | Blow- Friday Date 8 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मतदार यादीत अनियमितता; महाराष्ट्रात बनावट मतदार वाढल्याचा आरोप

## खोटी शपथपत्र आणि खोटे पुरावे देणं हा गुन्हा; राहुल गांधी यांना राज्य निवडणूक आयोगाचं पत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाष्य करताना बोगस मतदाराचा आरोप केला. विधानसभा निवडणुकीत तब्बल १ कोटी बोगस मतदार होते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांच्या या टीकेला आता राज्य निवडणूक आयोगाने प्रत्युत्तर दिलं आहे. राज्य निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना पत्र पाठवलं आहे. काँग्रेसच्या प्रतिनिधींना याआधीच मतदार यादी दिली होती असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला शपथपत्र द्यावं. त्या शपथपत्रात सर्व माहिती नमूद करावी, असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं आहे. तसेच खोटी शपथपत्र आणि खोटे पुरावे देणं हा गुन्हा असल्याचं देखील निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

काँग्रेसच्या प्रतिनिधींना २ वेळा नवीन मतदार यादी पाठवली आहे. मतदार यादीत बोगस मतदार असल्याचा आरोप तुम्ही केला आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला याबाबत एक शपथपत्र लिहून द्यावं. पुढील कारवाईसाठी त्या बोगस मतदाराचं नाव नमूद करावं, असं आवाहन निवडूक आयोगाने आवाहन केलं आहे.




खोटं शपथपत्र देणं हा कलम ३१ नुसार गुन्हा आहे. खोटे पुरावे देणं हा भारतीय न्यायसंहितेच्या कलम २२७ नुसार गुन्हा आहे, असंदेखील निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना बजावलं आहे. तसेच तुम्ही स्वत: त्या संबंधित मतदारसंघाचे मतदार आहात की नाही हे सुद्धा नमूद करावे, असंदेखील निवडणूक आयोगाने बजावलं आहे.

**राहुल गांधी यांनी मतदान चोरीचा आरोप केला आहे. एकूण पाच पद्धतीने मतदान चोरीचा पॅटर्न असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यात १ कोटी नवे बनावट मतदार वाढल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. बनावट मतदार, फेक आणि चुकीचा मतदारांचा पत्ता, एकाच पत्त्यावर अनेक मतदार, चुकीचे फोटो आणि फॉर्म ६ चं उल्लंघन या पद्धतीने बनावट मतदार वाढवण्यात आल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. यासाठी राहुल गांधींनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीमध्ये महादेवपुरा मतदारसंघांचं उदाहरण देत थेट आकडेवारी मांडली. त्यांच्या आरोपांना आता निवडणूक आयोगाने प्रत्युत्तर दिलं आहे. या प्रकरणात आता आगामी काळात काय-काय घडामोडी घडतात ते पाहणं महत्त्वाचं आहे.**

# धक्कादायक! ट्रॅक्टरवरील पाईपला विद्युत तारेचा स्पर्श, विजेचा धक्का लागून सोलापुरात दोघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापुरात विजेचा धक्का लागून दोन जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर गावात ही घटना घडली आहे. बसवराज शिवानंद पाटील (वय ३४) आणि रविकांत धोंडप्पा नाईकवाडे (वय ३७) दोघेही राहणारे हत्तूर अशी मृतांची नावे आहेत. तर दुसरीकडे पावसामुळे पाणी साचलेल्या डबक्यात पडून ९ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. ही घटना सोलापुरातल्या नई जिंदगी परिसरातील देसाई नगर इथं घडली आहे.

विजेचा धक्का लागून मृत्यू होण्याची आठवड्याभरातील सोलापूर जिल्ह्यातील तिसरी घटना आहे. या आधीच्या दोन घटनामध्ये विजेचा धक्का लागू चौघांचा मृत्यू झाला होता. हत्तूर येथे घडलेल्या घटनेत प्राथमिक माहितीनुसार दोघेही व्यक्ती शिवारात शेती काम सुरू असताना ट्रॅक्टरवर काम करत होते. ट्रॅक्टरवर लावलेला लोखंडी पाईप, वरुन गेलेल्या विद्युत तारेला लागला आणि त्यामुळं ट्रॅक्टरमध्ये अचानक करंट उतरला. या भीषण अपघातात दोघेही जागीच बेशुद्ध झाले. या घटनेनंतर तातडीनं त्यांना सोलापुरातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. सध्या मृतदेह शवविच्छेदनासाठी सिव्हिल रुग्णालयात आणण्यात आलं आहे. घटनेची माहिती होताच ग्रामस्थांनी आणि नातेवाईकांनी सिव्हिल रुग्णालयात गर्दी केली आहे. या दुर्घटनेमुळे हत्तूर गावात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

पावसामुळे पाणी साचलेल्या डबक्यात पडून ९ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

पावसामुळे पाणी साचलेल्या डबक्यात पडून ९ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना सोलापुरातल्या नई जिंदगी परिसरातील देसाईनगर इथं घडली आहे. आहिल उस्मान शेख असं मृत ९ वर्षीय मुलाचं नाव आहे. आहिल काल ६ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता घरातून बाहेर पडला होता. मात्र त्यानंतर तो घरी परतलाच नाही. नातेवाईक व शेजाऱ्यांनी त्याचा शोध घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण तो कुठेही सापडला नव्हता. आज दुपारी २ च्या सुमारास देसाई नगर येथील एका प्लॉटिंग परिसरातील ड्रेनेजच्या मेन हाऊसजवळ साचलेल्या पाण्यात त्याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बेशुद्धवस्थेत आहिल याला तत्काळ सिव्हिल हॉस्पिटलला हलवण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी उपचाराचा पूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केलं.

# भागीरथीशी छेडछाड, नदीपात्रात हस्तक्षेप अन् अतिक्रमण; धरालीचा विनाश ही मानवी चूक?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धराली: उत्तरकाशीतील धराली गावात दोन दिवसांपूर्वी ढगफुटीने मोठी नैसर्गिक आपत्ती उद्भवली होती. या ढगफुटीनंतर खीरगंगा नदीला पूर आला आणि पुराच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात गाळ वाहून आला. सध्या तज्ज्ञ या दुर्घटनेमागील नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. या घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला आहे आणि ६० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.



पूरग्रस्त उत्तरकाशीमध्ये बचाव कार्य गुरुवारी तिसऱ्या दिवशी सुरु आहे. भारतीय सैन्याने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ७० लोकांना वाचवण्यात आले आहे, तर ६० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना शोधण्यासाठी धराली गावात प्रगत उपकरणे विमानाने पोहोचवण्याचे प्रयत्न तीव्र केले जात आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

जरी पुरामुळे ही दुर्घटना झाली असली, तरी त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान का झाले, शेकडो इमारती पाण्यासोबत वाहून आलेल्या मातीच्या गाळाखाली गाडल्या गेल्या आहेत. हे का झालं याचं कारण तज्ज्ञांनी मानवी हस्तक्षेपाला मानलं आहे.

प्रसिद्ध भूगर्भशास्त्रज्ञ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्लीचे एमेरिटस प्रोफेसर प्रो. के. शेषगिरी राव यांनी इंडिया टुडेला सांगितलं की, भागीरथी नदीच्या पात्रात अतिक्रमण झाल्यामुळे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान वाढले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रो. राव यांनी स्पष्ट केले की या भागात तीन ते चार दिवस सतत मुसळधार पाऊस पडत होता, ज्यामुळे मोठा गाळ धारालीत वाहून आला.

पर्वतीय प्रदेशांमध्ये ढगफुटी, हिमनदी तलावातील पूर आणि पावसाळी चिखलाचे प्रवाह यासारख्या नैसर्गिक धोक्यांचा सामना करावा लागतो. परंतु त्यांनी यावर भर दिला की धारालीमध्ये जो विनाश झाला तो नदीच्या नैसर्गिक प्रवाहात मानवी हस्तक्षेप वाढल्याने झाला आहे. नदीच्या पात्रातील अतिक्रमण आणि बांधकामांमुळे प्रवाहाची गतिशीलता बदलली. शक्तिशाली गाळाचा प्रवाह अत्यंत तीव्र वेगात आणि जोराने इमारतींवर आदळला, ज्यामुळे जीवित आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. नदीच्या पात्रातील हस्तक्षेप आणि आजूबाजूला झालेल्या बांधकामांमुळे प्रवाह वाहून जाण्यासाठी आवश्यक असलेली रुंदी कमी झाली होती, त्यामुळे अधिक नुकसान झाले.

अशा संवेदनशील नदीच्या पात्रातील बांधकामांना परवानगी का देण्यात आली याबद्दलही त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीकोणातून संवेदनशील आणि आपत्ती-प्रवण क्षेत्रांमध्ये या अनियोजित विस्तारामुळे स्थानिकांना धोका वाढला आहे.

उत्तरकाशी दुर्घटनेत नदीकाठ आणि इतर उच्च-जोखीम क्षेत्रांवर अतिक्रमण रोखण्यासाठी भू-वापर धोरणांचे नियमन आणि अंमलबजावणी करण्याची तातडीची गरज असल्याचं यावरुन दिसून येते. तसेच, भविष्यातील आपत्तींदरम्यान नुकसान कमी करण्यासाठी निसर्गाला धक्का न लावता शाश्वत शहरीकरण पद्धती अवलंबण्यात यावी, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

# राज्यातील ५ ज्योतिर्लिंग विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगाने अंमलबजावणी व्हावी, यासाठी पाच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी संबंधित ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांतील कामांचा नियमितपणे आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना सादर करतील.

राज्यातील पाच ज्योतिर्लिंगांचा विकास करण्यासाठी आराखडे तयार करण्यात आले आहेत. या आराखड्यांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावी या करिता या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्योतिर्लिंग व त्यांच्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त अधिकारी पुढीलप्रमाणे - श्री क्षेत्र भीमाशंकर (जि.पुणे) - सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा., श्री. क्षेत्र घृष्णेश्र्वर (जि. छत्रपती संभाजीनगर) - उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी. श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) - वित्त विभागाचे प्रधान सचिव श्री. सौरभ विजय. श्री. क्षेत्र औंढा नागनाथ (जि. हिंगोली) - वित्त विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती रिचा बागला. श्री. क्षेत्र परळी वैजनाथ (जि. बीड) - इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव श्री. आप्पासाहेब धुळाज. या पाच ज्योतिर्लिंगांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना उच्चाधिकारी समित्यांच्या बैठकांमध्ये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार वेळोवेळी शासन निर्णय देखील काढण्यात आले आहेत. त्यानुसार श्री. क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र (पान २ वर...)

गोव्यात राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १०व्या राष्ट्रीय महाअधिवेशनाचे उद्घाटन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं वक्तव्य

# कितीही टार्गेट केले तरी ओबीसींच्या हक्कासाठी मी लढतच राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पणजी : माझ्यावर ओबीसी समाजाबद्दल बोललो म्हणून टीका केली जाते, पण मी कुठल्याही एका समाजाबद्दल बोलत नाही. मला कितीही टार्गेट केले तरी ओबीसी समाजाच्या हक्कासाठी मी लढतच राहणार आहे. एका समाजासाठी आवाज उठवला म्हणजे दुसऱ्या समाजाच्या विरोधात बोलतो आहे असं म्हटलं जातं. पण माझं धोरण तसं नाही. जोपर्यंत ओबीसी समाज प्रगतीच्या मुख्य प्रवाहात येत नाही, तोपर्यंत प्रगत भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही, असं वक्तव्य महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गोव्यात आयोजित केलेल्या राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १०व्या राष्ट्रीय महाअधिवेशनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. या अधिवेशनासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, प्राध्यापक डॉ. बबनराव तायवाडे, आमदार परिणय फुके, माजी मंत्री विजय वड्डेटीवर, माजी मंत्री महादेव जानकर, आमदर किसन कथोरे, आमदार अभिजीत वंजारी आदी मान्यवर उपस्थित होते.




उद्घाटनानंतर मनोगत व्यक्त करताना फडणवीस म्हणाले, 'आज इथे ७६ मागण्या मांडण्यात आल्या आहेत. त्यापैकी २४ मागण्या केंद्राकडे करण्यात आल्या आहेत. त्या आपण केंद्राकडे पाठवू. २५ ते २६ मागण्या महाराष्ट्राकडे तर बाकीच्या मागण्या गोवा सरकारकडे करण्यात आल्या आहेत. मागण्यांवर आपण काम करु. काही झालं तरीही ओबीसी समाजासाठी काम करणारच, असा पुनरुच्चार फडणवीस यांनी केला.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनीही या कार्क्रमादरम्यान आपले विचार मांडले. 'ओबीसींनी सादर केलेल्या रिप्रेझेंटेशनवर महाराष्ट्र, गोव्यासह केंद्र सरकार विचाराधीन असून ओबीसींना न्याय, हक्क आणि आरक्षण मिळालेच पाहिजे,' असे मत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. मंडळ आयोगापासून आजपर्यंत आपल्या हक्कांसाठी ओबीसी समाज लढत आहे. भाजपा सरकार ओबींसींच्या हक्कासाठी तत्पर असून सरकारद्वारा ओबीसी समाजासाठी चांगले निर्णय घेण्यात आले आहेत. मागील काही वर्षात ओबीसींच्या नावावर फक्त राजकारण करण्यात आले. समाजाचा वापर करून काहींनी फक्त पदे उपभोगली. मात्र ओबीसींना न्याय आणि घटनात्मक हक्क पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले.

केंद्र सरकारने जाहीर केल्यानुसार २०२७ मध्ये जातीनिहाय जनगणना देशात होणार असून ही इतिहासात नोंद करण्यासारखी घटना आहे. या जनगणनेद्वारे पॉलिसी डिसीजन घेण्यात येणार आहे. विकसीत भारत २०४७मध्ये ओबीसी बांधवांचे योगदान काय आहे? हे समजण्यासाठी जातीनिहाय जनगणना महत्त्वाची आहे.

रेल्वे, बँकिंग सारख्या सर्व क्षेत्रात केंद्राकडून २७ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. जेव्हा आपण एकमेकांचा हात धरून पुढे जाऊ तेव्हाच समाजाचा विकास होईल, समाज परिवर्तन होईल. कोणताही ओबीसी बांधव दुर्लक्षित राहू नये यासाठी सबका साथ, सबका विकास या धोरणाची गरज असल्याचे प्रतिपादन सावंत यांनी केले.

गोवा सरकारच्या मंत्रीमंडळात ३ ओबीसी मिनिस्टर असून ही माझ्यासाठी गौरवाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. गोव्यात ओबीसी कॉर्पोरेशन असून त्याद्वारे शैक्षणिक, व्यवसाय, गृह कर्ज देण्याचे काम सरकार करत आहे. आर्थिक विकासासाठी गोवा सरकार नेहमी तत्पर आहे. ओबीसी सर्टिफिकेशनसाठीही सरकारने कायमच तत्परता दाखवली असून यासाठी आता ई सर्टिफिकेशनचा पद्धत अवलंबली जाणार आहे. महिला सशक्तीकरणमध्येही ओबीसी कार्पोरेशनचे मोठे योगदान असल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### आरोपाचे खंडन

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाष्य करताना बोगस मतदाराचा आरोप केला. विधानसभा निवडणुकीत तब्बल १ कोटी बोगस मतदार होते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांच्या या टीकेला आता राज्य निवडणूक आयोगाने प्रत्युत्तर दिलं आहे. राज्य निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना पत्र पाठवलं आहे. काँग्रेसच्या प्रतिनिधींना याआधीच मतदार यादी दिली होती असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला शपथपत्र द्यावं. त्या शपथपत्रात सर्व माहिती नमूद करावी, असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं आहे. तसेच खोटी शपथपत्र आणि खोटे पुरावे देणं हा गुन्हा असल्याचं देखील निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. काँग्रेसच्या प्रतिनिधींना २ वेळा नवीन मतदार यादी पाठवली आहे. मतदार यादीत बोगस मतदार असल्याचा आरोप तुम्ही केला आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला याबाबत एक शपथपत्र लिहून द्यावं. पुढील कारवाईसाठी त्या बोगस मतदाराचं नाव नमूद करावं, असं आवाहन निवडूक आयोगाने आवाहन केलं आहे. खोटं शपथपत्र देणं हा कलम ३१ नुसार गुन्हा आहे. खोटे पुरावे देणं हा भारतीय न्यायसंहितेच्या कलम २२७ नुसार गुन्हा आहे, असंदेखील निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना बजावलं आहे.

## राज्यातील ५ ज्योतिर्लिंग विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी ...

(पान १ वरून..)

विकास आराखड्यातील १४८ कोटी ३७ लाख रुपयांच्या सुमारे ११ कामांना मंजुरी देण्यात आली आहे. श्रीक्षेत्र घृष्णेश्र्वर तीर्थक्षेत्र विकास आराखडा १५६ कोटी ६३ लाख रुपयांचा आहे. श्री श्रेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखड्यातील २७५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. श्री. क्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा १५ कोटी २१ लाख रुपयांचा आहे. तर श्री श्रेत्र परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील २८६ कोटी ६८ लाख रुपयांच्या ९२ कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील विविध कामांना गती मिळावी, ही कामे दर्जेदार आणि गतीने व्हावीत, यासाठी संबंधित अधिकारी समन्वय साधणार आहेत. अशा पद्धतीने विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी मंत्रालयीन स्तरावरून समन्वय, संनियंत्रणासाठी अधिकारी नियुक्तीचा निर्णय पहिल्यांदाच घेण्यात आला आहे.

# स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला 'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी



बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दुष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चक्र कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल. आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. रक्षाबंधनाच्या निमित्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा!

**चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्काराने अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांचा, तर चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराने अभिनेत्री मुक्ता बर्वे यांचा गौरव**

# ६० व्या व ६१ व्या राज्य मराठी चित्रपट पारितोषिकांचे पुरस्कारांचे वितरण

- **स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना, तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने अभिनेत्री काजोल यांना सन्मानित करण्यात आले**
- **गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने ज्येष्ठ गझलगायक भिमराव पांचाळे यांचा, तर छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्काराने युनेस्कोतील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांचा गौरव**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठी चित्रपटांना आणि चित्रकर्मींना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून देण्यात येणारे राज्य मराठी चित्रपट पुरस्कार व पारितोषिकांच्या वितरण सोहळ्याचे हीरक महोत्सवी पर्व मंगळवारी मुंबईतील डोम एसव्हीपी सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी ६० व्या आणि ६१ व्या राज्य मराठी चित्रपटविषयक पारितोषिकांचे, तसेच सन २०२४ करिता चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव व विशेष योगदान पुरस्कार आणि स्व. राज कपूर जीवनगौरव व विशेष योगदान पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार आणि छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्काराचेही वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी महसूल व वने अपर मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, तसेच सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यासह चित्रकर्मी, चित्रपटरसिक आणि माध्यमकर्मी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ६० व्या व ६१ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात सन २०२२ व सन २०२३ मध्ये

**राज्य शासनाच्या मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे हीरक महोत्सवी पर्व उत्साहात संपन्न**

प्रदर्शित मराठी चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी विविध कार्यगटांतील पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. तसेच यावेळी चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्काराने अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांचा, तर चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराने अभिनेत्री मुक्ता बर्वे यांचा गौरव करण्यात आला. तसेच स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना, तर स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने अभिनेत्री काजोल यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. तर गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गझलगायक भिमराव पांचाळे



यांना प्रदान करण्यात आला. तसेच यावर्षीपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये मानांकन मिळाल्याबद्दल राज्य शासनाकडून 'छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार' सुरू करण्यात आला आहे. या पुरस्काराने यावेळी युनेस्कोतील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांना तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे जतन व संवर्धनासाठी प्रयत्नशील असलेल्या अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघास सन्मानित करण्यात आले.

६० वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार – २०२२

१. उत्कृष्ट कला दिग्दर्शन – महेश कुडाळकर (उनाड)

२. उत्कृष्ट छायालेखन – अभिजीत चौधरी / ओंकार बर्वे (४ ब्लाईन्ड मेन) व प्रियषंकर गोष (ह्या गोष्टीला नावच नाही)

३. उत्कृष्ट संकलन – एस सुर्वे – (काटा कीर्रर)

४. उत्कृष्ट ध्वनिमुद्रण – सुहाश किशोर राणे (ह्या गोष्टीला नावच नाही)

५. उत्कृष्ट ध्वनिसंयोजन – लोचन प्रताप कानविंदे – हर हर महादेव

६. उत्कृष्ट वेशभूषा – उज्वला सिंग – ताठकणा

७. उत्कृष्ट रंगभूषा – सुमेध जाधव / सौरभ कापडे – ताठकणा

८. उत्कृष्ट बालकलाकार – श्रीनिवास पोकळे (छुमंतर) / अर्नव देशपांडे (आम्ही बटरफ्लाय)

९. सर्वोत्कृष्ट कथा – सुमीत तांबे (समायरा)

१०. उत्कृष्ट पटकथा – तेजस मोडक – सचिन कुंडळकर (पॉन्डीचेरी)

११. उत्कृष्ट संवाद – प्रविण तरडे (धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे)

१२. उत्कृष्ट गीते – अभिषेक खणकर – (अनन्या – गाणे – ढगा आड या )

१३. उत्कृष्ट पार्श्वसंगीत – हनी सातमकर (आतूर)

१४. उत्कृष्ट पार्श्वगायक – मनिष राजगिरे (धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे गाणे – भेटला विठ्ठल माझा)

१५. उत्कृष्ट पार्श्वगायिका (विभागून) – आर्या आंबेकर (चंद्रमुखी) व अमित घुगरी (सोयरिक)

१६. उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक – उमेश जाधव (धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे – गाणे – आई जगदंबे)

१७. उत्कृष्ट संगीत – निहार शेंबेकर (समायरा)

१८. सहाय्यक अभिनेता – योगेश सोमण – (अनन्या)

१९. सहाय्यक अभिनेत्री – मृण्मयी देशपांडे (चंद्रमुखी)

२०. उत्कृष्ट विनोदी अभिनेता – संजय नार्वेकर (टाईमपास ३)

२१. उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता – जयदीप कोडोलीकर (ह्या गोष्टीला नावच नाही)

२२. उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्री – ऋता दुर्गुळे (अनन्या)

२३. उत्कृष्ट अभिनेत्री – अमृता खानविलकर (चंद्रमुखी) सई ताम्हणकर (पॉन्डीचेरी)

२४. उत्कृष्ट अभिनेता – प्रसाद ओक (धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे)

२५. प्रथम पदार्पण चित्रपट निर्मिती – झेनिथ फिल्मस् (आतूर)

२६. प्रथम पदार्पण चित्रपट दिग्दर्शक – प्रताप फड (अनन्या)

२७. सामाजिक प्रश्न हाताळणारा चित्रपट – समायरा

२८. सामाजिक प्रश्न हाताळणारा चित्रपट दिग्दर्शक – ऋषी देशपांडे

२९. ग्रामीण प्रश्न हाताळणारा चित्रपट – गाभ

३०. ग्रामीण प्रश्न हाताळणारा चित्रपट दिग्दर्शक – अनुप जत्राटकर

३१. सर्वोत्कृष्ट चित्रपट क्र.१ – धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे

३२. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक क्र.१ – प्रविण तरडे

३३. उत्कृष्ट चित्रपट क्र.२ – पॉन्डीचेरी

३४. उत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक क्र.२ – सचिन कुंडलकर

३५. उत्कृष्ट चित्रपट क्र.३ – हर हर महादेव

३६. उत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक क्र.३ – अभिजीत देशपांडे

६१ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचे मानकरी

(१) उत्कृष्ट कला दिग्दर्शन – अमेय भालेराव (श्यामची आई)

(२) उत्कृष्ट छायालेखन – जिप्सी (प्रवीण सोनवणे)

(३) उत्कृष्ट संकलन – जिप्सी (अक्षय शिंदे)

(४) उत्कृष्ट ध्वनीमुद्रण – कुणाल लोळसुरे (श्यामची आई)

(५) उत्कृष्ट ध्वनीसंयोजन – विकास खंदारे (जिप्सी)

(६) उत्कृष्ट वेशभूषा – मानसी अत्तरदे (जग्गु आणि ज्युलिएट)

(७) उत्कृष्ट रंगभूषा– हमीद शेख व मनाली भोसले (हजार वेळा शोले पाहिलेला माणूस)ड़

(८) उत्कृष्ट बालकलाकार (विभागून) – कबीर खंदारे व त्रिशा ठोसर (नाळ २)

(९) उत्कृष्ट कथा – सुधाकर रेड्डी (नाळ २)

(१०) उत्कृष्ट पटकथा – शशी चंद्रकांत खंदारे (जिप्सी)

(११) उत्कृष्ट संवाद – अंबर हडप व गणेश पंडित (जग्गु आणि ज्युलिएट)

(१२) उत्कृष्ट गीते – वैभव देशमुख (नाळ २ – गरगरा भिंगोरी)

(१३) उत्कृष्ट पार्श्वसंगीत – अद्वैत नेमळेकर (नाळ २)

(१४) उत्कृष्ट पार्श्वगायक – मोहीत चौहान (घर, बंदूक, बिर्याणी)

(१५) उत्कृष्ट पार्श्वगायिका – ऋचा बोंद्रे (श्यामची आई)

(१६) उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक – राहुल ठोंबरे व संजीर हाउलदार (जग्गु आणि ज्युलिएट)

(१७) उत्कृष्ट संगीत – अजय-अतुल (महाराष्ट्र शाहीर)

(१८) उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता – संतोष जुवेकर (रावरंभा)

(१९) उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री – उषा नाईक (आशा)

(२०) उत्कृष्ट विनोदी अभिनेता – उपेंद्र लिमये (जग्गु आणि ज्युलिएट)

(२१) उत्कृष्ट विनोदी अभिनेत्री – निर्मिती सावंत (झिम्मा २)

(२२) उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता – दीपक जोइल (भेरा) उत्कृष्ट

(२३) प्रथम पदार्पण अभिनेत्री (विभागून) – श्रद्धा खानोलकर (भेरा) आणि गौरी देशपांडे (श्यामची आई)

(२४) उत्कृष्ट अभिनेता – अमेय वाघ (जग्गु आणि ज्युलिएट)

(२५) उत्कृष्ट अभिनेत्री – रिंकू राजगुरू (आशा)

(२६) उत्कृष्ट प्रथम पदार्पण चित्रपट दिग्दर्शक – आशिष बेंडे (आत्मपम्फ्लेट)

(२७) उत्कृष्ट प्रथम पदार्पण चित्रपट निर्मिती – बोलपट निर्मिती (जिप्सी)

(२८) उत्कृष्ट सामाजिक प्रश्न हाताळणारा चित्रपट –आशा

(२९) उत्कृष्ट सामाजिक प्रश्न हाताळणारा दिग्दर्शक – दीपक पाटील

(३०) उत्कृष्ट ग्रामीण प्रश्न हाताळणारा चित्रपट – जिप्सी

(३१) उत्कृष्ट ग्रामीण प्रश्न हाताळणारा दिग्दर्शक – शशी खंदारे

(३२) सर्वोत्कृष्ट चित्रपट क्रमांक १ – भेरा

(३३) सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक – श्रीकांत प्रभाकर भिड़े

(३४) उत्कृष्ट चित्रपट क्रमांक २ – जग्गु आणि ज्युलिएट

(३५) उत्कृष्ट दिग्दर्शक क्रमांक २ – महेश लिमये

(३६) उत्कृष्ट चित्रपट क्रमांक ३ – नाळ २

(३७) उत्कृष्ट दिग्दर्शक क्रमांक ३ – सुधाकर व्यंकटी रेड्डी

(३८) विशेष बालकलाकार सन्मान – भार्गव जगताप (नाळ २)

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त श्यामची आई या चित्रपटाचा सन्मान करण्यात आला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

**प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलफुल सोलापूर उपक्रमांतर्गत पर्यटन विकास कार्यशाळेचे उद्घाटन

## कृषी पर्यटन, निवासस्थाने आणि जागतिक पर्यटन सप्ताहाची रूपरेषा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलफुल (Soul-ful) सोलापूर उपक्रमांतर्गत आयोजित पर्यटन विकास कार्यशाळेचे उद्घाटन आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या कार्यशाळेत जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले, पुणे विभागाचे पर्यटन समन्वयक अधिकारी सूर्यकांत भुजबळ, पर्यटन उपसंचालक कुंभार मॅडम, पर्यटन प्रकल्प अधिकारी मयूर नांगरे, सहाय्यक पर्यटन अधिकारी गुणवंत पवार, जिल्हा उपनिबंधक सहाय्यक आबासाहेब गावडे, पर्यटन विभाग महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कृषी पर्यटन केंद्र संचालक समिती अध्यक्ष लहू अवताडे,जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वर्खडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी चिंचणी गावाच्या पर्यटन विकासाचा यशस्वी अनुभव सांगतआई योजना अंतर्गत महिलांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची माहिती दिली. त्यांनी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना



ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याचे आवाहन केले. कुडल येथील ८०० वर्षांपूर्वीच्या शिलालेखासारख्या ठिकाणांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यटन सप्ताहात व्यापाऱ्यांनी सवलतीच्या दरात सेवा देण्याचे आवाहन त्यांनी केली.

जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी कृषी पर्यटन योजनेच्या माध्यमातून शेततळे, फळबाग, नर्सरीसाठी सहाय्य उपलब्ध असल्याचे सांगितले. त्यांनी शाश्वत शेतीच्या संकल्पनेवर भर देत जमिनीची सुपीकता राखण्याच्या गरजेवरही प्रकाश टाकला.

पुणे विभागाचे पर्यटन अधिकारी अभिजीत उघडे यांनी निवासस्थानांच्या विविध प्रकारांची माहिती दिली. त्यात स्थानिक कुटुंबासोबत राहण्याची संकल्पना, वेकेशन होम, पर्यटक व्हिला आणि पर्यटक अपार्टमेंट यांचा समावेश होता. महा बुकिंग प्रणालीवर व्यवसायाची नोंदणी करून प्रमाणपत्र मिळवता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेत उपस्थित उद्योजकांनी जल पर्यटनातील बोटींची मागणी, नर्सरी नोंदणी प्रक्रिया आणि शेती परिसरातील निवासस्थाने उभारण्यासाठी कर्ज योजनांबाबत प्रश्न विचारले. काही निवासस्थाने हायवेपासून अर्धा किलोमीटर अंतरावर असून, तेथे विदेशी पर्यटकही भेट देत असल्याचे एका घरमालकाने सांगितले.

या कार्यशाळेच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन, कृषी आणि महिला उद्योजकता यांना नवी दिशा मिळणार असून, पर्यटन सप्ताहाच्या आयोजनामुळे जिल्ह्याचा सांस्कृतिक आणि आर्थिक विकास अधिक गती घेईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

प्रारंभी पर्यटन समन्वयक श्री. भुजबळ यांनी प्रास्ताविक केले. यात २७ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक पर्यटन दिवस साजरा करण्याच्या अनुषंगाने २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान पर्यटन सप्ताह साजरा केला जाणार असल्याची माहिती दिली. या सप्ताहात सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळांना भेटी देण्यात येणार असून, पर्यटन दिंडीचे आयोजनही करण्यात येणार आहे. कृषी पर्यटन केंद्रांमुळे ग्रामपंचायतींना आर्थिक लाभ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# चिमुकल्यांनी पाठवल्या सीमेवरील जवानांना ४०० राख्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारत देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र कडा पहारा देणाऱ्या भारतीय सीमेवरील सर्व जिगरबाज जवानांना येणाऱ्या रक्षाबंधन सणानिमित्त तालुक्यातील पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड येथील इयत्ता ५वी ते १० वी च्या मुला-मुलींनी ४०० राख्या पाठवून जवानांबद्दलचे भाऊ-बहिणीचे अनोखे प्रेम जोपासले आहे, राख्या बनविण्यासाठी विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.याप्रसंगी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्दवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे,



कविता ढोमसे,सारिका पवळे, राहुल दवते, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते.सदर उपक्रमात शाळेच्या मुला -मुलींनी सीमेवरील जवानांना पत्र पाठवून त्यात आम्हा सर्वांचे आयुष्यही या धाडसी,शूर व जिगरबाज जवानांना लाभो तसेच सैनिकांबद्दल अतिशय चांगल्या स्वरूपाचे गुणगान गायले असून अश्या स्वरूपाची मनोमन प्रार्थना देखील विद्यार्थीनी यावेळी देवाकडे केली आहे, याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप आहेर यांनी तर आभार संजय लव्हांगडे यांनी मानले.

**सदर उपक्रमाद्वारे विद्यार्थी दशेतच सैनिकांप्रती असलेली कृतज्ञता,आपुलकी,आत्मीयता प्रकट होऊन राखीच्या एका धाग्याने विद्यार्थ्यांचे आपल्या शूर सैनिकांशी अतूट असे नाते जोडले जावे. तसेच सैनिकांमध्ये असलेले शौर्य व शिस्त याबद्दल आदरभाव व देशप्रेम निर्माण होऊन सुजाण नागरिक घडावेत अशी अपेक्षा आहे.**

**- अशोक शेळके**
**मुख्याध्यापक-न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड**

# कुमठा येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील कुमठा येथे गेल्या कित्येक वर्षापासुन पारंपारीक चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजीत करण्यात आला होता. कुमठा येथील सप्ताहात सात दीवस कुमठा गावामध्ये प्रतिपंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दी पहायला मिळाली व सात दीवस मोठ्या भक्तीभावाने व जल्लोशात काकडा, हरिपाठ, प्रवचन, किर्तन यासारख्या सांप्रदायीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज सप्ताहात ग्रंथदिंडी काडण्यात आली या ग्रंथदिंडीत वारकरी व महिला वारकर्यांनी डोक्यावर ज्ञानेश्वरी ग्रंथ घेत पाउल खेळत भगवंताचे नामस्मरन करत फुगड्याचा आनंद लुटला गावात भक्तीमय वातावरण पहायला मीळाले व सुंदर व रुचकर अशा महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.

यावेळी ह.भ.प दत्ता महाराज गिरी, सोपानराव पाटील. नारायण पाटील व्यंकट गोरे, दिलीप पाटील, सिताराम घोडके नामदेव काळे, दीलीप पाटील, तुकाराम गोरे, महादेव गोरे. कमलाकर ईंगळे, नागनाथ जगताप, सरपंच मनिषा कांबळे .उपसरपंच आशोक जगताप .मा सरपंच अनंतराव जगताप ,सोपानराव पाटील , प्रा,सुभाष ईंगळे ,दिलीप पाटील ,व्यंकट सुर्यवंशी ,व्यंकट गोरे,नागनाथ जगताप,कमलाकर ईंगळे ,सुभाष इंगळै ,तुकाराम गोरे तुकाराम रेड्डी, भाउसाहेब जगताप व्यंकट भोसले, सुधाकर पाटील, नेताजी मोरे सह कुमठा गावातील भाविक भक्त उपस्थीत होते.

**ह.भ.प चैतन्य महाराज पंढरपुरकर यांच्या सुश्राव्य काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता !**

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी मधील डिप्लोमा फार्मसीचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ उन्हाळी परीक्षा २०२५ चा निकाल जाहीर झाला असून, गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टीटयूट संचलीत कॉलेज ऑफ फार्मसी (बी.फार्मसी) महाविद्यालयातील डिप्लोमा इन फार्मसी या अभ्यासक्रमाच्या निकालात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे त्यामुळे महाविद्यालयाचे विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.




या निकालात सर्व विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. डिप्लोमा फार्मसीच्या अंतिम वर्षाचा निकाल ९७.७२ टक्के तर प्रथम वर्षाचा निकाल ९३.७३ टक्के लागला आहे. अंतिम वर्षातील साक्षी प्रकाश वाघ ८३.६४ टक्के गुण घेवून प्रथम, तर प्रणाली वसंत कदम या ८२.८२ टक्के गुण घेवून द्वितीय क्रमांकावर आहेत तर अस्मिता महादेव पासले यांनी ८१.३६ टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक मिळविला. अंतिम वर्षातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थ्यांना ७५ टक्के पेक्षा जास्त गुण असल्याने विशेष गुणवत्ता यादी (डिस्टिंक्शन) मध्ये तर २२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तसेच प्रथम वर्षातील रोहिणी विश्वनाथ लम्बे ७९.१० टक्के गुण घेवून प्रथम, तर विनोद हनुमंत बंडगर ७७.६० टक्के गुण घेवून द्वितीय आणि पायल दत्तात्रय गदडे ह्या ७६.०० टक्के गुण घेवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. प्रथम वर्षात ५ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये तर २९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार हे विद्यार्थ्यांचा गौरव करताना म्हणाले की, 'विद्यार्थ्यांची चिकाटी, तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे बहुमोल सहकार्य यामुळे विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश प्राप्त केले आहे. भविष्यातही असेच यश मिळवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. संस्थेचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, पालक यांनी यशवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण व शिस्तबद्ध वातावरण यामुळे सातत्याने चांगले शैक्षणिक परिणाम साधले आहेत. यंदाचे घवघवीत यश हेच स्वेरीच्या प्रत्येक घटकाच्या गुणवत्तेचे प्रतीक आहे, हेच खरे!

# नर्सिंग स्कूल निफाडच्या वतीने जागतिक स्तनपान सप्ताहाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील नर्सिंग स्कूलच्या वतीने एक ते सात ऑगस्ट या दरम्यान जागतिक स्तनपान सप्ताहाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पवार यांच्या आदेशाने व ज्ञानेश्वर पवार यांचे मार्गदर्शन खाली साजरा करण्यात आला

याप्रसंगी नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी रॅली काढून तसेच हातात स्तनपान सप्ताह विषयीचे मार्गदर्शक फलक धरून जागृती केली. यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील गरोदर माता व इतर उपस्थित मातांना नर्सिंग स्कूल चे शिक्षक आनंद पवार यांनी मार्गदर्शन केले ते आपल्या मनोगतात म्हणाले की स्तनपान म्हणजे आईचे दूध जे अधिक महत्त्वाचे आहे ते बाळास पाजणे हे करत असताना काही नियमांची माहिती असणे आवश्यक आहे, मातेने योग्य आहार घ्यावा, योग्य ती स्थिती घेऊन एकाच बाजूने पाजावे, एकाच स्थनातील दूध संपल्यास बाळाची स्थिती दुसऱ्या बाजूला बदलावी, पाजण्यापूर्वी बाळाची हाणवटी किंवा ओठ स्तनाला स्पर्श करावेत ,हे स्तनपान पूर्ण सहा महिने करावे ,स्तनपान झाल्यावर बाळास उभे खांद्यावर धरून थोपटावे जेणेकरून त्याला ढेकर येईल, सहा महिन्यानंतर वरचे अन्न देखील द्यावे ,स्तनपान करण्याचे फायदे हे फक्त बालकाला नव्हे तर त्याचे फायदे हे मातेस देखील होतात

**स्तनपानाचे मातेस होणारे फायदे**

वजन कमी करण्यास मदत करते, कर्करोग होण्यापासून बचाव करते, भावनिक नाते जपते. गर्भाशय पूर्ववत होण्यास मदत होते ,रक्तस्राव कमी करते.

**तसेच स्तनपान केल्याने बाळास होणारे फायदे**

बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते ,पचनक्रिया सुधारते ,मेंदू विकसित करते ,एलर्जी कमी करते ,पोषण देते ,हाडे बळकट बनवते, लसीकरणाचे काम करते, वजन वाढवण्यास मदत करते, बौद्धिक क्षमता वाढवते, भावनिक जाणीव करून देते.



आदी फायदे यावेळी पवार यांनी सांगितले तसेच नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थिनींनी आपले मनोगतातुन स्तनपाना विषयी माहिती दिली.

याप्रसंगी नर्सिंग स्कूलचे शिक्षक पुनम सोनवणे, प्रविन ऊगले, दीपांजली ढिवरे, अश्विनी परदेशी, अक्षय साखरे, विशाल पारधे, आनंद पवार, तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ, डॉ अत्रे, डॉ गोराडे, डॉ आहेर डॉ कुठे, डॉ दाभाडे, इनचार्ज सिस्टर जाधव, फणसे, परिचारिका भावना कंटाळे आदी उपस्थित होते

**आज झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचं होत्याचं नव्हतं झालं..!**

# शेतकऱ्याची बैलजोडी पावसात गेली वाहून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**शेतकऱ्याची बैलजोडी वाहून गेली आणि मृत अवस्थेमध्ये सापडली. शेतकऱ्यावर आलेले दुःख शेतकऱ्यांनी पेलायचं कसं सांगा सरकार मायबापा शेतकऱ्यांनी जगायचं कसं..**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : आज हिवरखेड पूर्णा तालुका सिंदखेड राजा येथील शेतकरी शेतातील काम आटपून संध्याकाळच्या वेळेला बैलांना चारण्यासाठी नदीकाठी शेतकरी श्री काशिनाथ रामराव नागरे यांची बैल जोडी चारत असताना अचानक ढगफुटी होऊन अचानक वड्याला पाणी आल्यामुळे आज दिनांक ६ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ४ च्या सुमारास ढगफुटी होऊन अतिवृष्टी





झाली आणि त्यामध्ये ओढ्याच्या काठाला चरत असलेले खिल्लार जोडी किंमत अंदाजे १५०००० रु.किमतीचे वाहून जाऊन दोन-तीन तासांनी निमगाव वायाळ शिवारात मृत अवस्थेत सापडली. त्यावेळी शेतकऱ्यांनी फोडला टाहो सांगा सरकार मायबापा शेतकऱ्यांनी जगायचं कसं, ही घटना घडल्यानंतर तात्काळ प्रशासनाला माहिती देण्यात आली. त्यावेळी प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी जाऊन पंचनामा केला त्यावेळेस उपस्थित तहसीलदार मा.दिवटे साहेब, तलाठी मोगल साहेब, व्हीटर्नरी डॉ. साहिल देशमुख,पो.पाटील गजानन फूके तसेच गावातील शेतकरी यांच्या उपस्थितीत पंचनामा केला. या शेतकऱ्यांना राज्य सरकारने तात्काळ मदत द्या अशी मागणी शेतकरी योद्धा कृती समिती संस्थापक अध्यक्ष बालाजी सोसे यांनी केली आहे.

# बाबा ग्रुप फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वृक्षाच्या कत्तलीमुळे वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. मानवी आक्रमणामुळे जंगलतोड वाढल्याने वन्यजीव, पशुपक्षी वातावरणाला धोका निर्माण झाला आहे. वृक्षारोपण ही आजच्या काळाची गरज आहे, वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच महत्त्वाची बाब लक्षात घेऊन बाबा ग्रुप फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील लोनाड येथे वृक्षारोपण करून पर्यावरण वाचवण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी विविध प्रकारचे वृक्ष लवण्यात आले. वृक्षारोपणासोबतच बाबा ग्रुप



फाउंडेशन ग्रुपचे पदाधिकाऱ्यांनी वृक्षसंवर्धन करण्याचा ध्यास घेतला. संवर्धनासाठी सर्वांनी प्रतिज्ञा घेत वृक्षाची देखभाल पालनपोषण करेल, असा निश्चय केला. पर्यावरण अबाधित ठेवण्यासाठी वृक्षसंवर्धनासाठी बाबा ग्रुप फाउंडेशनने पुढाकार घेतल्याने सगळीकडे त्यांचे कौतुक होत आहे.

यावेळी बाबा ग्रुप फाउंडेशनने संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव, सचिव अनिकेत दोंदे, खजिनदार हरेश जाधव, लोणाड ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी व्यंकटी धोंडगे, सरपंच वनिता जाधव, सदस्य पुष्पराज भंडारी, गणेश भंडारी, प्रदीप गायकवाड, सुनिल जाधव, जावेद आली, साज खलिफा, प्रकाश गायकवाड, अक्षय राजपूत, ऋतिक जाधव, आदित्य जाधव, विशाल रातांबे तर आदी उपस्थित होते.

# सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या परंपरेप्रमाणे पोळा सणासाठी प्रति मे. टन रु. ७५ प्रमाणे ऊस बिल बँकेत वर्ग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या परंपरेप्रमाणे पोळा सणासाठी गळीत हंगाम २०२४ २५ मध्ये गाळप झालेल्या उसाचा प्रतिमेत्रिक टन रुपये ७५ प्रमाणे ऊस बिल बँकेत वर्ग केले आहे. स्वर्गीय सुधाकर पंत परिचारक मोठे मालक यांनी घालून दिलेली परंपरा आजही कारखाना



व्यवस्थापन जतन करीत असलेली माहिती कारखान्याचे चेअरमन मा.आ. श्री प्रशांत परिचारक यांनी दिली. यावेळी कारखान्याची व्हाईट चेअरमन मा श्री कैलास खुळे, संचालक व कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी कारखान्याचे चेअरमन मा.आ. श्री प्रशांत परिचारक यांनी माहिती दिली की कारखाना स्थापनेपासून ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना पोळा सणासाठी पैशाची गरज असल्याने ऊस बिल दिले जात होते. तीच परंपरा व्यवस्थापन आज ही जतन करीत असून शेतकऱ्यांचा अत्यंत महत्त्वाचा असणाऱ्या पोळ्या सणाला ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना पैशाची गरज असते. ती गरज ओळखून प्रतिमेत्रिक टन रुपये ७५ प्रमाणे ऊस बिल बँकेत वर्ग केले आहे. त्यामुळे ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांमधून आनंदाचे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर यांची जिल्ह्यात मागील सुमारे १५ वर्षापासून सर्वोत्कृष्ट ऊस दर देण्याची परंपरा असून नेहमीप्रमाणे पोळा सणासाठी कारखान्याने ऊस बिल देण्याची परंपरा जपलेली आहे त्यास अनुसरून ऊस बिल ही अदा केले आहे.

यावेळी कारखान्याची कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिलेली कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे गणित हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप केलेल्या उसाचा आजपर्यंत प्रतिमेत्रिक टन रुपये २७००/प्रमाणे रक्कम आदा केली आहे त्याचप्रमाणे पोळा सणासाठी पट्टी मेट्रिक टन रुपये ७५ प्रमाणे ऊस बिल बँकेत वर्ग केले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आतापर्यंत २७७५/प्रमाणे प्रतिमेत्रिक टन ऊस बिल मिळाले असून कारखाने ने ऊस उत्पादकांना एफआरपी पेक्षाही जादा रक्कम अदा केले आहे.

# पुरंदर तहसील कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर ::महसूल सप्ताह निमित्त पुरंदर तालुक्यामध्ये १ते ७ऑगस्ट या कालावधी मध्ये महसूल सप्ताह-चे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी त्यामध्ये सहभागी होऊन शासनाच्या विविध सेवांचा लाभ घ्यावा असे आव्हान पुरंदचे तहसीलदार विक्रम राजपूत साहेब यांनी केले आहे.सप्ताह-ची सुरवात १ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करून महसूल मधील कर्मचारी व अधिकारी तशेच निवृत्त कर्मचारी यांना सन्मान चिन्ह देऊन गौरव ण्यात आले.




दि. २ऑगस्ट रोजी शासकीय जा-गेवरील सन २०११पूर्वीपासून रहिवाशी प्रयोजनासाठी झालेली पात्र अतिक्रमन धार कांची अतिक्रमणे नियमित करण्याचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे.

दि. ३ऑगस्ट रोजी तालुक्यातील ६१पानंद शिव रस्ते खुले करण्यात येणार आहेत लोकप्रतिनिधी च्या हस्ते रक्षार-ोपण केले जाईल.

दि. ४ऑगस्ट रोजी सरस्वती मंगल कार्यालय काळेवाडी (दिवे )येथे छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान मध्ये विविध दाखल्यानंच वितरण होणार आहे.

दि. ५ऑगस्ट ला डिबीटी साठी कॅम्प होणार आहे.

दि. ६ऑगस्ट ला. शासकीय जा-गेवरील अतिक्रमणे निष्काशीत करणे तशेच शर्तभांग झालेल्या जमिनी बाबत शासन धोरनानुसार निर्णय घेण्यात येणार आहे.

दि. ७ऑगस्ट ला ा-िरपव या शासनाच्या नवीन धोरणबाबत प्रसिद्धी करण्यात येईल.व इच्छुक धारकांना खानपट्टा धारक, क्रेशर धारकांना परव-ानगी देण्यात येणार आहे.

महसूल सप्ताह बाबत अधिक माहिती साठी ग्रामहसूल अधिकारी, मंडलं अधिकारी,तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे संपर्क करावा असे आव्हान मा. तहसी-लदार साहेब विक्रम राजपूत यांनी केले आहे.



# कळंब - लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे जीवितहानी; शिवसेना आक्रमक, तीव्र आंदोलनाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे, कळंब लातूर रस्त्यावरील अपूर्ण कामांमुळे अनेक निष्प-ाप नागरिकांचा जीव गमवावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा गट) आणि स्थानिक नागरिक आक्रमक झाले असून, तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याचे काम अपूर्ण असून, खडकी गावाजवळील अरुंद पुलावर अपघात होऊन प्रकाश महाजन आणि मंगेश महाजन या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. यानंतर आमदार कैलास घाडगे पाटील यांनी दिनांक १० मे २०२५ रोजी पोलीस अधिक्षकांना पत्र पाठवून संबंधित अभियंता व कंत्राटदारावर सद-ोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याआधीही त्यांनी कार्यकारी अभियंता, लातूर आणि अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय म ुंबई यांना पत्राद्वारे सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

त्यानंतर कळंब शहरातील तरुण व्यापारी कै. रमेश होनराव यांचा करंजकल्ला गावाजवळील अरुंद वळणावर, चेतावणी फलक नसल्यामुळे दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. तसेच डिकसळ पाटी, त्रिवेदी कॉम्प्लेक्स, छत्रपती संभाजीराजे चौक या ठिकाणी नेहमीच मोठी वर्दळ असूनही गतिरोधक नसल्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) स्टाईलने तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा तहसीलदार यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुका प्रमुख सचिन काळे, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रदीप मेटे, शहर प्रमुख विश्वजीत जाधव, युवासेना तालुका प्रमुख पंडित देशमुख, उपशहर प्रमुख निर्भय घुले, शाम खबाले, संतोष लांडगे, प्रा. दिलीप पाटील, गोविंद जोगदंड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तालुका व्यापारी महासंघाचाही इशारा – रक्षाबंधनपूर्वी उपाययोजना करा..

**तालुका व्यापारी महासंघ, कळंब यांनी देखील निवेदनाद्वारे प्रशासनास इशारा दिला आहे. रक्षाबंधन काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशा सणासुदीच्या काळात करंजकल्ला वळणावर आणखी एखाद्या बहिणीचा भाऊ अपघातात गमावू नये, यासाठी तातडीने खालील उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे: करंजकल्ला वळणावर स्पीड ब्रेकर, चेतावणी फलक आणि दिव्यांची त्वरित व्यवस्था करावी, वळणाची रचना बदलून सुरक्षित वळण तयार करावे, भविष्यातील अपघात टाळण्यासाठी स्थायी उपाययोजना कराव्यात, जर वरील मागण्या त्वरित पूर्ण करण्यात आल्या नाहीत, तर स्थानिक व्यापारी व नागरिकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर तालुकाध्यक्ष नंदकिशोर मोरे, शहराध्यक्ष मयूर रुणवाल, तालुका सचिव बालाजी बावळे यांच्यासह अनेक व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.**




# कॉरिडोर रद्द करण्यासाठी महिलांचे अनोखे आंदोलन, रक्ताचा टिळा लावून केली मागणी; पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना पाठवल्या नो कॉरिडोरच्या राख्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना पाठवल्या नो कॉरिडॉरच्या राख्या, रक्ताचा टिळा पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्या फोटोला ला-वून केली मागणी.

पंढरपूर ज्या लाडक्या बहिणींनी देवा भाऊ च सरकार याव यासाठी देव पाण्यात ठेवले होते त्या सरकारने आमच्या घरावर नागर फिरवणे अशी मागणी करत येतील कॉरिडोर मधील संभाव्य बाधित कुटुंबातील महिलांनी पंतप्रधान सह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या छायाचित्रांना रक्ताचा टिळा लावत नो कॉरिडॉर नो डीपीच्या राख्या पाठवून अनोख्या आंदोलन केले.

येथील श्रीकृष्ण मंदिरासम ोरील चोफाळा येथे सदर आंदोलन करण्यात आले.

## कॉरिडोर रद्द करण्यासाठी महिलांचे अनोख्या आंदोलन

राज्य शासनाने जाहीर केलेल्या पंढरपूर कॉरिडोर अंतर्गत बाधित होणाऱ्या कुटुंबातील महिलांनी एकत्र येत राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर आजचे आंदोलन केले होते. यावेळी मोठ्या संख्येने एकत्र आलेल्या महिलांनी नो कॉरिडॉर नो डीपीचे लेवल लावलेल्या राख्या तयार केल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांना पोस्टाने पाठवण्यात आल्या. तत्पूर्वी महिलांनी पंतप्रधान मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांचे छायाचित्र असलेल्या फलकाला रक्ताचा टिळा लावला तसेच ओवाळून नो कॉरिडॉर नो डीपीच्या राख्या देखील बांधल्या.

# सुभेदार रामजी आंबेडकर यांच्या स्मारकासाठी प्रस्ताव सादर करावा : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

मुंबई : सातारा जिल्ह्यातील मायणी (ता. खटाव) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर यांच्या प्रशस्त स्मारकाच्या निर्मितीसाठी जलसंपदा विभागाकडील जमीन ताब्यात घेण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने प्रस्ताव सादर करावा. असे निर्देश सामाजिक राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. मंत्रालयातील दालनात आयोजित बैठकीस माजी आमदार दिलीप येळगावकर, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव श्री. बागुल, समाज कल्याण आयुक्तालयाचे सहाय्यक आयुक्त शितल सोनटक्के, सातारा सहायक आयुक्त सुनील जाधव उपस्थित होते, तर दूरदृष्यप्रणालीद्वारे सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी बैठकीत सहभाग घेतला. सामाजिक न्याय राज्यमंत्री माध-ुरी मिसाळ म्हणाल्या, सुभेदार रामजी आंबेडकर ब्रिटिशकालीन मायणी धरणाच्या बांधकामावेळी देखरेखीसाठी होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा मिळण्यासाठी या ठिकाणी हे स्मारक पूर्णत्वास आल्यास सुभेदार रामजी आंबेडकर यांचे हे पहिलेच स्मारक असेल. चांगल्या वास्तुविषारदांकडून स्म ारकाचा आराखडा तयार करण्यात यावा. स्मारकाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्विकारावी. यासंदर्भात ग्रामपंचायतीने ठराव घ्यावा. सर्व नियमांनुसार बाबी पूर्ण करून प्रस्ताव सादर करावा.

# कळंब तहसील कार्यालया मार्फत ४० घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळुचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे :

कळंब तहसील कार्यालया च्या योजना अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र ४० लाभधारकांना प्रत्येकी दोन ब्रास वाळूचे मोफत वाटप कळंब चे तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या आदेशानुसार वाटप करण्यात आले. तालुक्यातील पंचायत समिति




विभागाच्या वतीने तह-सील कार्यालयात प्रधानमंत्री घरकुल योजनेतील ६१ लाभार्थींची यादी कळंब तहसीलदार यांना देण्यात आली होती. यामध्ये सदरील घरकुल लाभार्थ्यांची चौकशी करून प्रत्येकी दोन ब्रास वाळू देण्याचे आदेश तहसीलदार यांनी देण्यात आले असून आतापर्यंत एकूण ४० लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्यात आली आहे.दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी कळंब तालुक्यातील डिकसळ येथील वाळु डेपो मधील प्रधानमंत्री घरकुल योजने अंतर्गत सात लाभार्थींना प्रत्येकी दोन ब्रास अशी वाळू वाटप करण्यात आली आहे.

यावेळी कळंब महसूल चे नायब तहसीलदार गोपाल तापडिया, महसूल अधिकारी ए आर पवार, डिकसळ सज्जाचे तलाठी इंगळे, व कार्यालयीन मदतनीस भागवत कदम यांच्या सह कळंब तालुक्यातील घरकुल लाभधारक उपस्थित होते.

**पंढरपूर नगरपालिकेत तृतीयपंथी समाजाची नगर पालिकेचे मुख्याधिकारी रोकडे सो यांनी घेतली बैठक**

**समाजांन टाकलेली माणसं समाज उपयोगी कामात येणार पुढे**

# तृतीयपंथी होणार अतिक्रमण विरोधी पथकात सामील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वंचितांचे नेते माऊली हळणवर यांच्या पुढाकाराने नगरपालिकेत पाठपुरावा सुरू असून आज मुख्याधिकारी रोकडे साहेब यांच्या दालनामध्ये तृतीयपंथी बांधव यांच्यासोबत एक बैठक झाली या बैठकीला माजी नगराध्यक्ष लक्ष्मण भाऊ शिरसाठ दीपक चंदनशिवे विक्रम भैया शिरसाठ यांच्यासह या सर्व तृतीयपंथींचे गुरु परश-



ुराम पवार उपस्थित होते या बैठकीमध्ये मुख्याधिकारी यांनी केंद्र शासनाच्या योजनेनुसार




यांचा एक बचत गट स्थ-ापन करण्याच्या सूचना दिल्या बचत गटाच्या माध्यमातून यांना उद्योगधंद्यासाठी केंद्र सरकारच्या योजनेनुसार कर्ज उपलब्ध करून मिळणार आहे तसेच नगरपालिकेच्या भरारी व अतिक्रमण विरोधी पथकामध्ये यांची नेमणूक करण्याचे आश्वासन दिले तसेच नगरपालिकेकडून यांना पालकमंत्री महोदयांच्या सूचनेनुसार जागा व पंतप्रधान घरकुल योजनेतून यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सर्व पूर्तता केली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर सर्व तृतीयपंथी बांधवांनी मुख्याधिकाऱ्यांचे आभार मानले... यावेळी माऊली भाऊ हळणवर माजी नगराध्यक्ष लक्ष्मण भाऊ शिरसठ,दीपक चंदनशिवे,विक्रम शिरसठ,परसु राम पवार वैष्णवी वाघमारे सीमा माने वैशाली शिरसाट नगमा गायकवाड सोनाली साबळे नीता माने आयेशा माने यांच्यासह बांधव उपस्थित होते